Annexure-III

Maharashtra University of Health Sciences, Nashik

**Trust Deed / Bylaws / Registration Certificate**
**Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))**

Faculty- Physiotherapy
Name of College/Institute- Suryadatta Institute of Health Sciences, Bavdhan, Pune- 411021

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | Suryadatta Education Foundation |
| Registration Certificate | | Trust :- F-17505 Pune (Vide via ACT 29, Bombay Public Trust Act of 1950 REGULATION)<br><br>Society: Maharashtra 1214/2000 Pune [Society Registration Act 1860 (act 21 of 1860)]<br><br>Hospital (Bombay Nursing Act) :- NA |
| Name of the College / Institute (As per First Affiliation letter) | : | Suryadatta Institute Of Health Sciences- College of Physiotherapy |
| Address | : | 342, Patil Nagar, Bavdhan, Pune- 411021 |
| Email ID | : | scop.sihs@suryadatta.edu.in |
| Telephone / Mobile No.(s) | : | 020-67901300/7262011338/9765551321 |
| Website | : | www.sgisihs.org |
| College Code | : | 162118 |

SEF's Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune - 21

Dean/ Principal Stamp & Signature

**Dr. Seemi A. Retharekar (PT)**
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अर्ज क्र. 557/22 वर्ष
अर्जदाराचे नांव :- ॲड राजपुरोहित
नकलेचा अर्ज आला तो दिनांक 22-12-2021
नकल तयार दि.:-
नकल दिली तो दि.: 24-1-2022

CRNo. 19621

SCHEDULE – III
VIDE RULE 13(1)
REPORT OF CHANGE

Name of the Public Trust : Suryadatta Education Foundation

Address of the Trust : 2074, Sadashiv Peth, Vijayanagar Colony, Pune- 411030

Exh 1

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

Reporting Trustee : Mrs. Sushama Sanjay Chordiya

Society Reg. Number : MAH/1214/2000/Pune Date:25/10/2000

Trust Reg. Number : P.T.R. No. F-17505/ PUNE Date: 25/01/2001

| NATURE OF CHANGE | REASON FOR CHANGE | REMARKS |
|---|---|---|
| **To record the Amendments in the Memorandum of Association and Rules and Regulations of the Applicant Trust as per Annexure 'A'.**<br><br>Comparative table showing old clause and amended clause of the Memorandum of Association and the Rules and Regulations is attached as Annexure –'A' | 1. That, the present amendment is carried out as per clause no. 26 of the Rules and Regulations of the Applicant Trust.<br><br>2. That, the proposed amendments in the Memorandum of Association and Rules and Regulations of the applicant Trust were discussed in the | 1. Copy of the Societies Registration Certificate.<br><br>2. Copy of the Trust Registration Certificate.<br><br>3. Copy of Notice dated 05/04/ 2021 convening Governing Body meeting held on 15/04/2021 along with Notice Service Proof.<br><br>4. Copy of Minutes of Governing Body Meeting held on 15/04/2021 along with Attendance.<br><br>5. Copy of Notice dated 22/04/2021 convening |

Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune - 21 SEF'S

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

(3)

| | | |
|---|---|---|
| | Meeting of Governing Body held on 15/04/2021.<br>3. The said proposed amendments were approved in Annual General Body Meeting held on dated 08/05/2021.<br>4. Thereafter said proposed amendments were approved and confirmed in Special General Meeting held on dated 11/06/2021.<br>5. Hence present change be accepted and approved accordingly. | Annual General Body held on 08/05/2021 Meeting Along with notice Service proof<br>6. Copy of Minutes of Annual General Body Meeting held on 08/05/2021 along with Attendance.<br>7. Copy of Notice dated 10/05/2021 convening Special General meeting held on 11/06/2021 along with Notice Service Proof<br>8. Copy of Minutes of Special General meeting held on 11/06/2021 along with Attendance.<br>9. Copy of old Memorandum of Association and Rules and Regulations of the Applicant Trust.<br>10. Copy of Amended Memorandum of Association and Rules and Regulations of the Applicant Trust.<br>11. Copy of Membership Register<br>12. Copy of Previous |

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

(4)

| | | |
|---|---|---|
| | | Change Report . |

REPORTING TRUSTEE

PUNE

DATE: 6/8/2021 ADV. FOR REPORTING TRUSTEE

## VERIFICATION

I, Mrs. Sushama Sanjay Chordiya, Age:- __Yrs, R/at:- Flat No. 8, Silver Arch, Model Colony, Lakai Road, Near Chitranjan Vatika, Pune 411 016, do hereby state and verify that, whatever stated hereinabove is true and correct, to the best of my knowledge, faith and factual information

Reporting trustee

Solemnly ... that the facts ... application ... best of his information ... belief
by Smt/Shri Sushma S. Chordiya
who ...
by Aadhar No. 859660261882
Whom I personally known
Date: 6/8/2021

Public ... Office
... Pune

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

SEF'S Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune - 21

## मा.सहायक धर्मादाय आयुक्त-२, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

न्यासाचे नाव :- सुर्यदत्त एज्युकेशन फौंडेशन
नोंदणी क्र :- एफ-१७५०५/पुणे
महा. १२१४/पुणे
बदल अर्ज क्र :- १९६२/२०२१.
(किरकोळ अर्ज क्र. २४५/२०२१)
कलम :- २२, १२ /१२-अ

### नि.क्र.१ वरील आदेश
दि.२१/१२/२०२१.

१. प्रस्तुतचा बदल अर्ज महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ नुसार न्यासाच्या ज्ञापन व नियम-नियमावली मध्ये झालेल्या बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. बदल अर्ज नि.क्र. १ चे अवलोकन केले असता, न्यासाची दिनांक १५.०४.२०२१ व दि. ११/०६/२०२१ रोजी विशेष सर्वसाधारण सभा होऊन त्यातील ठरावानुसार न्यासाच्या ज्ञापन व नियम-नियमावली मध्ये बदल करण्यात आला. त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

३. संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १२/१२ अ प्रमाणे किरकोळ अर्जाची पुर्तता केलेली आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत सभेची नोटीस, नोटीस पोहोच, सभा उपस्थितीसह सभेचे इतिवृत्त, तुलनात्मक तक्ता, न्यासाच्या जुन्या ज्ञापन व नियम-नियमावलीची छायांकीत प्रत, न्यासाच्या सुधारीत ज्ञापन व नियम-नियमावलीची प्रत, इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम-नियमावलीस अनुसरुन केला असल्यामुळे झालेला

Asst. Charity Commissioner ★ Puna

SEF'S Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune-21

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करतो.

**आदेश**

१. बदल अर्ज व किरकोळ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

३. या आदेशाची दुसरी प्रत किरकोळ अर्ज क्र.२४५/२०२१ ला लावण्यात यावी.

४. खर्चाबाबत हूकूम नाही.

५. अर्जदारांना आदेशाची माहिती देण्यात यावी.

ठिकाण :-पुणे
दि :-२१/१२/२०२१.

Asst. Charity Commissioner Pune

(रा.जी. चव्हाण)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-२
पुणे विभाग पुणे

Charity Commissioner Pune

सही शिक्क्याची खरी नक्कल

२५-१-२२

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

२५-१-२२
मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

SEF'S Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune - 21

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

Jn. no- 1962/21

Exh-7

महाप्रबंधक धर्मादाय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

अर्ज क्र. 557/21 ... कलम
अर्जदाराचे नांव :- अॅड राजश्री ...
नकलेचा अर्ज आला तो दिनांक 22-12-2021
नक्कल तयार दि.:-
नक्कल दिली तो दि.:- 24-1-2022

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

## सुर्यदत्त एज्युकेशन फौंडेशन

२०७४, सदाशिव पेठ, विजयनगर कालनी, पुणे ४११०३०

## नियम व नियमावली

१. संस्थेचे नावः— सुर्यदत्त एज्युकेशन फौंडेशन

२. संस्थेचा पत्ताः— २०७४, सदाशिव पेठ, विजयनगर कॉलनी, पुणे ४११०३०.

३. सभासदत्वः—

१. २१ वर्षावरील कोणत्याही व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल. सदर नविन इच्छुक सभासद हा किमान पदवीधर पास असला पाहिजे. परंतु यापुर्वी सभासदत्व दिलेल्या व्यक्तींना सदर पात्रता निकष लागू असणार नाही.

२. कोणत्याही व्यक्तींस सभासद करावयाचे किंवा नाही हे कार्यकारी मंडळाच्या निर्णयावर अवलंबून राहील.

३. प्रत्येक सभासदाकडुन त्याच्या सभासदत्वाच्या अर्जासोबत रू. १००००/— (रूपये दहा हजार) प्रवेश फी घेणे आवश्यक आहे.

४. आश्रयदाते व आजिव सभासद सोडून इतर प्रत्येक सभासदाला वार्षिक वर्गणी ही रू. ५०,०००/— (रूपये पन्नास हजार) दयावी लागेल.

४. सभासदांचे प्रकारः— संस्थेचे तीन प्रकारचे सभासद राहतील.

अ. आश्रयदाते सभासदः— संस्थेस रू. २०,००,०००/— (रूपये वीस लाख फक्त) अथवा जास्त रकमेची देणगी देणारी व्यक्ती ही संस्थेची आश्रयदाते सभासद होण्यास पात्र ठरेल. कार्यकारी मंडळ अशा व्यक्तीचा आश्रयदाता सभासद म्हणून समावेशाबाबत निर्णय यापुर्वी सभासदत्व दिलेल्या व्यक्तींना सदर पात्रता निकष लागू असणार नाही.

Asst. Charity Commissioner Pune

ब. आजीव सभासदः— संस्थेकडे १०,००,०००/— (रूपये दहा लाख फक्त) पर्यंत रक्कम एकरकमी जमा करणारी व्यक्ती ही संस्थेची आजीव सभासदाकरिता पात्र राहील.

SEF'S Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune-21

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

यापुर्वी सभासदत्व दिलेल्या व्यक्तींना सदर पात्रता निकष लागू असणार नाही.

क. **सर्वसाधारण सभासदः—** सभासदांची पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक व्यक्तीस संस्थेच्या माननीय सचिवांकडे सर्वसाधारण सभासदाकरिता अर्ज विहीत नमुन्यात प्रवेश फी भरून व आवश्यक त्या कागदपत्रांसोबत अर्ज करता येईल. सदरचा अर्ज हा कार्यकारी मंडळाने मंजुर केल्यास सदरची व्यक्ती संस्थेची सर्वसाधारण सभासद मानली जाईल. सर्वसाधारण सभासदाने प्रत्येक वर्षी रक्कम ५०,०००/— (रक्कम रू. पन्नास हजार फक्त) भरणे बंधनकारक राहील. यापुर्वी सभासदत्व दिलेल्या व्यक्तींना सदर पात्रता निकष लागू असणार नाही.

५. **सभासदत्व रद्द होणे:—** सर्वसाधारण सभेस हजर असणाऱ्या व मताचा अधिकार असणाऱ्या सभासदाला बहुमताने खालीलपैकी कोणत्याही एका कारणाने मंडळातुन काढुन टाकण्यात येईल.

अ. सभासद फी ही प्रतिवर्षी त्या वर्षाच्या सुरूवातीस म्हणजेच १ एप्रिल रोजी दयावी लागेल. ती त्या आर्थिक वर्षासाठी असेल. १ एप्रिल पासुन पुढे १५ दिवसांपर्यंत सभासद वर्गणी भरण्याची मुदत राहील. या कालावधीत एखादया सभासदाने सभासद फी न दिल्यास त्या सभासदाचे सभासदत्व त्या वर्षासाठी संपुष्टात येईल. अशा सभासदास परत संस्थेचे सभासद होण्याकरिता सभासद फी भरून सभासद होता येईल परंतु सदर सभासद तथा वर्षीच्या निवडणुक प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास पात्र राहणार नाही. कार्यकारी मंडळास अशा सभासदाच्या सभासदत्वाबाबत निर्णय घेण्याचा पुर्ण अधिकार राहील.

ब. फौजदारी गुन्हा दाखल झाल्यास अगर गैरवर्तन केल्यास जर कार्यकारीणीच्या मते संस्थेच्या हिताविरूध्द काही कृत्य करीत असेल तर व त्याने संस्थेस बदनामीकारक कृत्य केले असेल तर सभासदत्व रद्द करण्यात येईल.

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

सचिव

खजिनदार

क. कमीतकमी एक वर्ष गेल्यावर सदस्यत्व मंडळास तीन महिन्यांची लेखी नोटिस देवून कोणाही सभासदाचे सभासदत्व रद्द करता येईल. मात्र तसे करण्यापुर्वी त्यांच्या बद्दल येणे असलेली रक्कम तिची फेड केली किंवा नाही याची चौकशी करून जर पुर्ण रक्कम भरली असेल तरच राजीनामा मंजुर करता येईल. त्याला (सभासदाला) प्रवेश फी, वार्षिक फी, आजीव सभासद फी इत्यादी परत करता येणार नाही.

६. **सभासदांची यादी:—** फौंडेशनच्या एकुण सभासदांची सभासदत्वाच्या प्रकारांनुरूप एक अद्ययावत यादी तयार करण्यात येईल. सदर सभासदत्व नोंदणी ही सभासद रजिस्टरमध्ये करण्यात येईल व संस्थेच्या एकुण सभासदांची नोंद प्रत्येकाच्या सभासदत्वा प्रकाराप्रमाणे, करण्यात येईल व ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येईल.

७. **सभासदांचे अधिकार:—**

अ. फौंडेशनच्या प्रत्येक सभासदांस सर्वसाधारण सभेस हजर राहण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा अधिकार राहील.

ब. निवडुन दिलेल्या कार्यकारिणीतील सदस्यांना मंडळाच्या नियमांचे अनुशंगाने नाव विचारण्याचा किंवा स्पष्टीकरण मागता येईल. त्याप्रमाणे आपले मुद्दे मांडण्याचा अधिकार राहील.

८. **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना:—** संस्थेचे सर्व कामकाज व कारभार हा कार्यकारी मंडळातर्फे चालविल्या जाईल. कार्यकारी मंडळ ही निर्वाचित मंडळ असुन प्रत्येक पाच वर्षांनी त्यातील सभासदांची सर्वसाधारण सभेमधुन निवडणुक करण्यात येईल.

१. कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे राहील: कार्यकारी मंडळ हे एकुण ७ सभासदांचे असतील. त्यातील ३ सभासद हे आजीव सभासदांमधुन व दोन सभासद हे आश्रयदाते सभासद यांचेमधुन निवडले जातील व उर्वरित सभासद हे सर्वसाधारण

अध्यक्ष सचिव खजिनदार

Dr. Seema A. Rethared kar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

सभासदांमधुन निवडण्यात येतील. कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे पदाधिकारी असतील:—

१ अध्यक्ष, २. सचिव ३. खजिनदार ४. चार संचालक असे एकुण ७ जणांचे कार्यकारी मंडळ राहील. संस्थेचे अध्यक्ष व सचिव हे कायम आश्रयदाते सभासदांमधुनच निवडण्यात येतील.

२. कार्यकारी मंडळाचे सदस्य हेच मंडळाचे विश्वस्त म्हणून काम पाहतील.

९. कार्यकारी मंडळाची कामे:—

१. संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळित पार पाडण्यासाठी कामाचे व्यवस्थापन करणे व त्याप्रमाणे दैनंदिन कामे पार पाडणे.

२. संस्थेच्या कार्यालयाची व्यवस्था पाहणे, संस्थेचे दैनंदिन पत्रव्यवहार पाहणे, संस्थेची स्थावर, जंगम मालमत्ता वगैरे वर देखरेख करणे.

३. नोकर व्यवस्थापक यांच्या नेमणुका करणे, त्यांचा पगार ठरविणे, त्यांचे कामावर देखरेख ठेवणे, दंड करणे, पगारवाढ देणे, नोकरीतुन कमी करणे इत्यादी अधिकार कार्यकारी मंडळास राहतील.

४. पंचवार्षिक निवडणुकीची अथवा पोटनिवडणुकीची व्यवस्था करणे.

५. अंदाजपत्रक तयार करणे, बँकेतील खाती चालविण्याबद्दल अधिकाराचा ठराव करून तो बँकेला कळविणे.

६. सर्वसाधारण व वार्षिक सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळाच्या सभा बोलविणे.

७. संस्थेचे मालकीच्या इमारतीचे तसेच जमीनीचे भाडे ठरविणे तसेच त्यामध्ये वाढ करणे अथवा कमी करणे.

८. संस्थेचे संचित धन, निधी, प्राप्ती व उत्पन्नावर ताबा ठेवणे व त्याचे विनियोगावर देखरेख करणे.

९. कलम ७ व ८ ची कार्ये ही व्यवस्थापकीय समितीची प्रथम शिफारस घेवून त्यानंतर त्या अनुषंगाने करणेचे आहे.

अध्यक्ष    सचिव    खजिनदार

Asst. Charity Commissioner, Pune

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

SEF's Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune-21

१०. संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निरनिराळ्या योजना करून त्या राबविणे.

११. एखादा सभासद जर संस्थेचे हिताविरूध्द वर्तनकरीत असले तर त्याला बहुमताने अपात्र ठरवून कमी करणे.

१२. संस्थेच्या उद्देश सिध्दीसाठी परंतु संस्थेचे हितसंबंधात बाधा येणार नाही अशा रितीने कोणतेही नैमत्तिक कृत्य करणे.

१३. सदर संस्थेचे बाबतीत न्यायालयीन प्रकरणे दाखल करणे व संस्थेवर दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणी उपस्थित राहणे व ती अखेरपर्यंत चालविणे अथवा तडजोड करणे, काढुन घेणे, लवाद नेमणे.

१०. **सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्ये:—** फौंडेशनचे सर्व सभासद हे सर्वसाधारण सभेचे सभासद असतील. सर्वसाधारण सभा ही प्रत्येक वर्षी आर्थिक वर्ष संपल्यावर घेतली जाईल. सर्वसाधारण सभा ही न्यासाचे कार्यालयात अथवा कार्यकारी मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी घेतली जाईल. संस्थेच्या सर्व प्रकारच्या सर्वसाधारण सभा (गरजेच्या वेळी उदा. लॉकडाऊन) या ऑनलाईन पध्दतीने होतील व इतर वेळी नियमितपणे होतील. संस्थेचे अध्यक्ष हे सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष असतील व त्यांचे गैरहजरीत सर्वसाधारण सभा ही उपस्थित आजीव सभासदांमधुन अध्यक्ष निवडेल. कार्यकारी मंडळाचे सचिव हे सर्वसाधारण सभेचे सचिव म्हणुन कामकाज पाहतील. सर्वसाधारण सभेचे कार्ये खालीलप्रमाणे असतील.

१. कार्यकारी मंडळातील संचालकाची निवड सर्वसाधारण सभेमधुन प्रत्येकी ५ वर्षाकरिता केली जाईल.

२. लेखापरिक्षणाच्या कामासाठी ऑडीटर ची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.

३. अस्तित्वात असलेल्या नियमात व उद्देशात मंडळाच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटल्यास वाढ—घट—दुरूस्त्या करणे व एकुण उपस्थित असलेल्या सभासदांच्या ३/५ बहुमताने मंजुर करणे.

Dr. Seema A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

४. उपस्थित सदस्यांकडे संस्थेची कोणतीही बाकी शिल्लक असल्यास त्या सभासदास मतदानात भाग घेता येत नाही.

५. वार्षिक हिशोब मंजुर करणे अथवा नामंजुर करणे.

६. पुढील वर्षाचे अंदाजपत्रके तयार करणे व ते मंजुर करणे.

७. आयत्यावेळी अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय किंवा ठराव सभेसमोर मांडुन चर्चा करणे व ते मंजुर किंवा नामंजुर करणे.

८. सभासदास आपली म्हणणे मांडावयाची असेल तर कार्यकारिणीस दोन दिवस अगोदर रजिस्टर्ड ई–मेलद्वारे अथवा हस्तदेयाने कळविले पाहिजे.

९. कार्यकारी मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेणे व त्यास कार्योत्तर मंजुरी देणे.

१०. कार्यकारी मंडळास संस्थेच्या कामावद्दल, व्यवस्थेबद्दल व अन्य संबंधित प्रश्नांवर मार्गदर्शन करणे, सुचना देणे.

११. सर्वसाधारण सभेचे सुचना आणि गणसंख्या:—

१. सदरची सुचना सभासदांना किमान ७ दिवस अगोदर पाठविणे गरजेचे आहे. सदर सुचना तसेच विशेष सर्वसाधारण सभा यांची सुचना सचिव यांनी रजिस्टर्ड ए.डी. अथवा रजिस्टर्ड कुरियर, अथवा रजिस्टर्ड ई–मेल अथवा हस्ते अथवा अन्य रजिस्टर्ड इलेक्ट्रॉनिक मार्गाने पाठवतील.

२. सर्वसाधारण सभेस एकुण सभासद संख्येपैकी १/३ सभासदांची गणसंख्या असणे आवश्यक आहे. परंतु यदाकदाचित असा कोरम उपलब्ध न होवू शकल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासाच्या अंतराने पुन्हा सभा बोलविली जाईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

१२. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये:—

१. घटना दुरूस्ती अथवा कोणत्याही अत्यंत तातडीच्या विषयावर ठरावासाठी सचिव हे अध्यक्षांच्या आदेशानुसार अथवा एकुण सभासदांपैकी १/३ सभासदांनी सचिवाकडे तशी मागणी केल्यास सचिवांना विशेष सर्वसाधारण सभा बोलविता येईल.

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

२. विशेष सर्वसाधारण सभेची सुचना सभासदांना कमीत कमी २४ तास अगोदर लेखी दिली पाहिजे. रजिस्टर्ड ए.डी. / स्पीडपोस्ट / रजिस्टर्ड कुरीयर/ रजिस्टर्ड फॅक्स/ रजिस्टर्ड ई–मेल अथवा हस्ते अथवा अन्य रजिस्टर्ड इलेक्ट्रॉनिक मार्गाने पाठवतील.

३. विशेष सर्वसाधारण सभेत तातडीच्या विषयाव्यतिरिक्त अन्य विषयावर चर्चा व निर्णय घेता येणार नाही.

१३. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे:—

१. अध्यक्ष:—

१. संस्थेच्या कामकाजावर पुर्णपणे नियंत्रण ठेवणे.

२. सर्वसाधारण सभेचे, विशेष सर्वसाधारण सभेचे, व्यावसायिक समितीच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्षपद भुषविणे.

३. संस्थेचा आर्थिक व्यवहार अध्यक्ष, खजिनदार किंवा सचिव यांच्यापैकी दोघांच्या सहीने होतील.

४. संस्थेचे सर्व दप्तर अध्यक्षांच्या ताब्यात ठेवण्यात येईल.

५. संस्थेच्या सर्वसाधारण सभेत समसमान मतविभागणी झाल्यास निर्णयक जादा मत देणे.

६. संस्थेचे कार्यकारी मंडळाच्या सर्व सभेतील ठरावांची अंमलबजावणी करण्याचे आदेश देणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करून घेणे.

७. सचिवांशी विचारविनिमय करून एखादया व्यक्तीस संस्थेचे आजीव सभासदत्व देण्यासंदर्भात निर्णय घेणे. संस्थेच्या सभासदाच्या तक्रारीचे निवारण करणे.

८. संस्थेच्या उद्देशपुर्तीकरिता प्रयत्नशील राहणे.

९. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ते कोर्ट कचेरीचे काम पाहणे.

१०. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेली इतर आवश्यक कामे करणे.

११. आवश्यक त्या कामासाठी सेवकाची नेमणुक करणे.

२. सचिव:—

Asst. Charity Commissioner, Pune

SEF's Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune-21

Dr. Seema A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष | सचिव | खजिनदार

१. संस्थेच्या सभांची अध्यक्षांच्या पुर्व परवानगीने नोटिस काढुन सभेचे आयोजन करणे व सभेचा वृत्तांत लिहीणे.

२. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वार्षिक अहवाल, अंदाजपत्रक इत्यादी सादर करणे.

३. संस्थेसंबंधीची वेळोवेळी सर्व पत्रव्यवहार करणे व तो मागणीनुसार कार्यकारी मंडळापुढे सादर करणे.

४. संस्थेच्या सर्व प्रकारच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे रजिस्टर ठेवणे, न्यास कायदा, १९५० चे कलम ३६ वी नियम २४ (अे) नुसार परिशिष्ट १० अेअे नुसार ठेवण्यास येईल.

५. अध्यक्षांच्या आदेशानुसार संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे व अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे.

६. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेली इतर आवश्यक कामे करणे.

७. अध्यक्षांशी विचार विनिमय करून एखादया व्यक्तीस संस्थेचे आजीव सभासदत्व देण्यासंदर्भात निर्णय घेणे.

३. खजिनदार:—

अ. संस्थेचे हिशोब व्यवस्थित ठेवणे.

ब. सरकार तर्फे विविध अनुदान मिळण्याकरिता प्रयत्न करणे तसेच अल्पसंख्यांक समाजासाठी अनुदान मिळविण्याकरिता प्रयत्न करणे.

क. वर्गणी गोळा करणे तसेच सी.एस.आर. अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व संस्थेकरिता सी.एस.आर. अंतर्गत देणग्या मिळविणे व त्यांचा संस्थेच्या कामास उपयोग करणे.

ड. विद्यापीठातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा समाजातील गरजू विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देणे.

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

इ. संस्थेच्या विस्ताराकरिता विविध उपक्रमांतुन निधी उभारणे.

ई. संस्थेस समाजातील दानशुर व्यक्तीकडुन तसेच स्तुतिप्रित्यर्थ येणाऱ्या देणग्या स्विकारणे.

उ. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्यांचा लाभ मिळवून देणे.

ऊ. तसेच संस्थेचे आर्थिक अंदाजपत्रक तयार करणे व ते दाखल करणे.

ए. संस्थेचे आयकर विवरण / टी.डी.एस. / पी. एफ. / पी. टी. / जी.एस.टी. इ. दाखल करणे.

४. संचालकः— संस्थेचे पदाधिकारी म्हणुन काम करणे, कार्यकारी मंडळाची सामुदायिक जबाबदारी सांभळणे, संस्थेच्या हिताची कामे करणे व आवश्यक असेल त्या पदाधिकाऱ्याला (अध्यक्ष, खजिनदार, सचिव) यांना त्यांच्या कामात मदत करणे.

१४. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दतः—

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ वर्षांचा राहिल व ५ वर्षानंतर सर्व प्रकारच्या सभासदाकडुन निवडणुक घेणे, नविन कार्यकारी मंडळ अस्तित्वात येईल.

१५. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा—

१. कार्यकारी मंडळाची सभा दर ३ महिन्यांनी म्हणजेच वर्षात कमीतकमी ४ वेळा घ्याव्या लागतील.

२. संस्थेच्या सर्व प्रकारच्या कार्यकारी मंडळाच्या सभा (गरजेच्या वेळी उदा. लॉकडाऊन) या ऑनलाईन पध्दतीने होतील.

३. विशेष अथवा तातडीच्या कामाकरिता एका आर्थिक वर्षामध्ये ४ पेक्षा अधिक सभा घेता येतील.

४. कार्यकारी मंडळाच्या कमीतकमी ४ सभासदांनी रजिस्टर्ड ए.डी. / रजिस्टर्ड स्पीडपोस्ट / रजिस्टर्ड कुरीयर / रजिस्टर्ड ई—मेल अथवा हस्ते अथवा अन्य रजिस्टर्ड इलेक्ट्रॉनिक मार्गाने कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षांना मागणी केल्यास कार्यकारी

अध्यक्ष सचिव खजिनदार

Dr. Seemi A. Rethrekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

मंडळाच्या मागणीची सभा अशा मागणी केलेल्या तारखेपासुन १५ दिवसांच्या आत बोलविली जाईल.

**१६. कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या:—**

१. कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना कमीतकमी ४ दिवस अगोदर सभासदांना दिली पाहिजे. सदर सभेची सुचना रजिस्टर्ड ए.डी. / रजिस्टर्ड स्पीडपोस्ट / रजिस्टर्ड कुरीयर/ रजिस्टर्ड ई—मेल अथवा हस्ते अथवा अन्य रजिस्टर्ड इलेक्ट्रॉनिक मागनि पाठवतील.

२. तातडीच्या विषयाकरिता कार्यकारी मंडळाची विशेष सभा ही अध्यक्षांच्या सुचनेप्रमाणे सचिवांना बोलविण्याचा अधिकार राहिल व त्याकरिताची सभेची कमीतकमी २४ तासाच्या अवधीची सुचना सभासदांना देणे आवश्यक राहील.

३. कार्यकारी मंडळाच्या सभेस २/३ कोरम असणे आवश्यक आहे. परंतु यदाकदाचित असा कोरम उपलब्ध न होवू शकल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासाच्या अंतराने पुन्हा सभा बोलविली जाईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

**१७. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम:—**

१. कार्यकारी मंडळ हे एकुण सात व्यक्तींचे असेल.

२. कार्यकारी मंडळावर निवडुन आलेल्या, नेमणुका झालेल्या सभासदास संस्थेच्या उद्दिष्ट पुर्ततेसाठी काम करवे लागेल.

**१८. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणेबाबत:—**

१. कार्यकारी मंडळात राजीनामा, मृत्यु वा अन्य काही कारणाने अथवा इतर काही कारणाने एखादी जागा रिक्त झाली तर कार्यकारी मंडळाच्या सभासदांच्या संमतीने अशी भरता येईल.

२. अशा नव्याने भरलेल्या जागेचा कालावधी हा तो सभासद ज्याच्या जागेवर नियुक्त झाला आहे त्याच्या उरलेल्या कार्यकाला एवढाच आहे.

**१९. व्यवस्थापकीय समिती:—**

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune - 21

अध्यक्ष | सचिव | खजिनदार

Asst. Charity Commissioner, Pune

१. व्यवस्थापकीय समिती ही ५ जणांची असेल. यामध्ये आश्रदाते सभासदांमधुन २ जण व आजीव सभासदांमधुन ३ जण असे एकुण ५ सभासद असतील. व्यवस्थापकीय समिती ही तहहयात राहील.

अ. व्यवस्थापकीय समितीची कामे:—

१. मुख्यत्वेकरून संस्थेच्या स्थावर व जंगम मिळकती खरेदी करणे, देखभाल करणे याबाबतचे सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापकीय समिती यांना असेल.

२. आवश्यकता भासल्यास कार्यकारी मंडळाला योग्य तो सल्ला देणे.

३. कार्यकारी मंडळाला आवश्यकता भासल्यास व्यवस्थापकीय समितीमधुन सभासद घेवून उप समिती नेमू शकेल.

४. संस्थेच्या सर्व कारभारावर देखरेख करण्याचे काम व्यवस्थापकीय समितीचे असेल.

ब. संस्थेचे अध्यक्ष व सचिव हेच व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष व सचिव असतील. व्यवस्थापकीय समितीची सभा साधारणत: ४ महिन्यांतून एकदा होईल. व्यवस्थापकीय समितीचे सचिव अध्यक्षांच्या परवानगीने सभेची नोटिस जारी करून त्याप्रमाणे सभा बोलवतील. सचिव हे सभेच्या कामकाजाचा वृत्तांत लिहून ठेवतील.

२०. शाखा:— संस्थेचे कार्यक्षेत्र हे देशभर व संपुर्ण जगभर असल्याने संस्थेच्या व्यवस्थापकीय समिती समितीच्या संयुक्त निर्णयाने आवश्यक असेल तेव्हा योग्य त्या ठिकाणी संस्थेची शाखा उघडता येईल.

२१. सभासदांकरीता नियमावली:— संस्थेच्या सभासदांकरिता नियमावली, आचारसंहिता तयार करण्याचे काम कार्यकारी मंडळ करेल व सदर नियमावली सर्वसाधारण सभेत मंजुर करून ती सर्व सभासदांना नियम व अचारसंहिता या स्वरूपात लागू करता येतील.

SEF'S Suryadatta Institute of Health Science (SIHS) Pune-21

Dr. Seemi A. Rethrekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष | सचिव | खजिनदार

२२. **हिशोबाचे वर्ष:—** संस्थेच्या हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल (आर्थिक वर्ष).

२३. **संस्थेचे उद्देश व नावांत बदल:—** संस्थेचे नांव किंवा उद्देश यामध्ये बदल करताना अथवा दोन संस्थांचे विलीनीकरण करताना १८६० चे संस्था अधिनियमातील कलम १२ व १२अ याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. सदर सुधारणा या भारतीय आयुक्त (सुट) यांच्या पूर्वपरवानगीने व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० च्या नियमांन्वये होईल.

२४. **स्थावर मिळकत खरेदी विक्री:—** संस्थेच्या उद्देशाच्या पुर्ततेसाठी संस्थेस स्थावर मिळकत धारण करता येईल. गरजेनुसार या बाबत व्यवस्थापकीय समितीची सभा होवून जो निर्णय होईल त्या प्रमाणे स्थावर मालमत्ता उदा., जमिन, इमारत, सुविधा जागा इ. भाडयाने / दीर्घ मुदतीच्या कराराने शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी तसेच सक्षम प्राधिकरण यांचेकडुन कोणत्या स्थळी अथवा देशात तसेच जगभर घेता किंवा देता येईल व खरेदीविक्री करता येईल. संस्थेची एखादी मिळकत विक्री करण्यापुर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या तरतुदीचे पालन करून मा. धर्मादाय आयुक्त यांच्या योग्य त्या पुर्वपरवानग्या घेणे आवश्यक आहे.

२५. **बॅक खाते:—** संस्थेस आपल्या नावाने कोणत्याही राष्ट्रीय/ शेडयुल/ बॅकेत खाते उघडता येईल. संस्थेचे बॅक खाते अध्यक्ष, सचिव व खजिनदार या तिघांपैकी कोणा दोघांच्या संयुक्त सहीने चालविता येईल.

२६. **नियम व नियमावलीतील बदल:—** संस्थेचे नियम व नियमावलीतील बदल करण्याचा अधिकार वार्षिक/ विशेष सर्वसाधारण सभेस राहील. उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने असा बदल मंजुर करता येईल. संस्थेच्या ज्ञापन व नियम व नियमावलीत बदल/ सुधारणा हा संस्थेची मूळ घटना/ ज्ञापन/ उपनियम/ पोटकलमे याचा एकीकृत भाग राहिल व सदर सुधारणा

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS),
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

या भारतीय आयकर आयुक्त (सुट) यांच्या पूर्वपरवानगीने व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० च्या नियमांन्वये होईल.

२७. संस्थेचा निधी, मिळकत व विनियोगः—

१. संस्थेकडे जमा होणारी वार्षिक सभासद फी, आजीवन सभासद फी, आश्रयदाते सभासद देणगी याशिवाय देणग्या, संस्थेने केलेल्या कामाची शैक्षणिक फी इत्यादी स्वरूपात मिळणारी तसेच सरकारी अनुदाने हा संस्थेचा निधी राहील.

२. संस्थेला स्थावर जंगम मिळकत भारतामध्ये व संपुर्ण जगामध्ये धारण करता येईल.

३. संस्थेकडे येणाऱ्या निधीचा उपयोग संस्थेस कार्यकारी मंडळ विश्वस्त समितीच्या सल्ल्याने ठरवेल त्याप्रमाणे परंतु संस्थेच्या उद्दिष्ट पुर्ततेसाठीच करता येईल.

४. संस्थेच्या निधीचा विनियोग हा संस्थेच्या उद्देशाकरीताच केला जाईल. यापुढे देणगी, खरेदी, संपादित केलेली मिळकत ही संस्थेची मिळकत म्हणून समजण्यात येईल. भारतीय आयकर कायदयाच्या कलम क.११ (५) नुसार निधीची गुंतवणूक करणे.

२८. उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतुदः— संस्थेला खालीलप्रमाणे खर्च करता येईल.

| | | |
|---|---|---|
| उद्देश पुर्तीसाठी | : | ८० टक्के |
| व्यवस्थापणासाठी | : | २० टक्के |
| एकुण | : | १०० टक्के |

२९. कर्ज किंवा ठेवी संबंधी तरतुदः— कर्ज किंवा ठेवी संबंधी तरतुदः— संस्थेची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी बॅंका अथवा तत्सम संस्थाकडुन संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येतील. तसेच संस्थेला सरकारमान्य शेअर्स स्किम तसेच म्युच्युअल फंड, ठेवी ठेवता येतील, मात्र त्यापुर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये तरतुदीप्रमाणे मा. धर्मादाय सह. आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी आवश्यक राहील. कलम ३५ व ३६ प्रमाणे मा. धर्मादाय सह. आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी आवश्यक राहील.

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

३०. संस्थेचे विसर्जन:— संस्थेचे विसर्जन करण्याचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येते. संस्थेचे विसर्जन झाल्यानंतर जी काही संस्थेची सर्व दायित्व अदा केल्यानंतर शिल्लक राहिलेली मालमत्ता हस्तांतरण भारतीय आयकर कायदा, १९६१ च्या १२ अअ अन्वये नोंदणीकृत असलेल्या तसेच ज्या सार्वजनिक धर्मादाय संस्थेचे उद्देश समान असतील अशा संस्थेस करण्यात येईल आणि शिल्लक राहिलेल्या मालमत्ते चे कोणत्याही परिस्थीत सभासदांमध्ये वाटप/ वितरण होणार नाही.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सुर्यदत्ता एज्युकेशन फौडेशन, २०७४, सदाशिव पेठ, विजयनगर कॉलनी, पुणे ४११०३० या संस्थेच्या नियमावलीची ही खरी प्रत असुन ती बरोबर आहे.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

Exh 18

<u>सुर्यदत्त एज्युकेशन फौंडेशन</u>

२०७४, सदाशिव पेठ, विजयनगर कॉलनी, पुणे ४११ ०३०

<u>ज्ञापन</u>

१. संस्थेचे नांव :— सुर्यदत्त एज्युकेशन फौंडेशन

२. संस्थेचा पत्ता:— २०७४, सदाशिव पेठ, विजयनगर कॉलनी, पुणे ४११ ०३०

३. संस्थेचे कार्यक्षेत्र:— भारत व भारताबाहेर संपुर्ण जगभर असे संस्थेचे कार्यक्षेत्र राहिल.

४. संस्थेचे उद्देश:—

अ)

१. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी व उच्च पदवीका, रात्र शाळा, तसेच सैनिकी शाळा, मुल्यवर्धन शाळा, गुरूकुल, डिफेन्स अॅकडमी, स्टार्टअप्स्, ऐच्छिक संस्था, ऑनलाईन शिक्षण सुविधा, महिलांकरीता स्वतंत्र संस्था व महाविद्यालये, शिक्षणविषयक विविध अभ्यासक्रम डी.एड., बी.एड. इ. अभियांत्रिकी पदवी, पदविका अभ्यासक्रम, पॅरामेडीकल अभ्यासक्रम, व्यवस्थापन शास्त्राचे, शेतीविषयक, पत्रकारीता व संवाद कौशल्येविषयक, आरोग्य विषयक विविध अभ्यासक्रम ज्यामध्ये नर्सिंग, मेडिकल, डेन्टल, फिजीओथेरपी इ. चे याबाबतीतील सर्व प्रकारचे अभ्यासक्रम त्यामध्ये होमिओपॅथी, आयुर्वेदिक, निसर्गोपचार, अॅलोपॅथी हे व अशाप्रकारचे सर्वसमावेशक शिक्षणविषयक अभ्यासक्रम त्याअनुषंगाने सुरू करणे त्याकरिता लागणारे वसतिगृह, लॅबोरेटरी, हॉस्पिटल, क्लिनीक्स, रिसर्च सेंटर व अशा

अध्यक्ष सचिव खजिनदार

Dr. Seema A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (S.I.H.S.)
College of Physiotherapy, Pune-21

स्वरूपाच्या सोयीसुविधा उपलब्ध करणे व स्थापन करणे.

२. सर्व प्रकारचे व्यावसायिक, करियर विषयक व इतर शैक्षणिक कोर्सेस चालविणे, त्याकरीता क्लासेस, मार्गदर्शन केंद्र, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, खाजगी विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ राज्यस्तरावरील विद्यापीठ आणि कालानुरूप आवश्यक त्या शिक्षण क्षेत्रातील संस्था स्थापन करणे व त्या चालविणे.

३. भारत व भारताबाहेरील विविध मुक्त/ अभिमत/ स्वतंत्र विद्यापीठांची केंद्रे चालविणे व त्यांच्याद्वारे शिकविले जाणारे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविणे.

४. देशातील व परदेशातील विविध संस्था, विद्यापीठांशी व इतर मान्यताप्राप्त संस्था, रूग्णालये आदी संस्थांशी गरजेनुसार आवश्यक तेथे परस्पर सहाय्य, सामंजस्य करार करून संलग्नता घेवून विविध कालावधीचे, स्वरूपाचे अभ्यासक्रम सुरू करणे तसेच राबविणे व इतर संबंधित उपक्रम राबविणे.

५. देशात, परदेशात, शहरी व ग्रामीण भागात शैक्षणिक शाखा उघडणे व त्या चालविणे. विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षण घेणाऱ्या नोकरदार महिलांकरिता राहण्याची सोय म्हणून वसतिगृह सुरू करणे व अनुषंगिक सोयीसुविधा उपलब्ध करणे.

६. समान उद्देशांच्या नोंदणीकृत संस्थांना आपल्या संस्थेशी संलग्न करून त्यांना आपले अभ्यासक्रम कोर्सेस चालविण्याचे अधिकार देणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे.

७. खाजगी विद्यापीठे, संस्था, कॉलेजेस, ट्रस्ट व्यवस्थापनाच्या अधिपत्याखाली संपुर्ण हक्काने चालविण्यास घेणे.

८. विविध कंपन्यांमधील कामगार, नोकरवर्ग, उपेक्षित वंचित कामगार यांच्या मुलांसाठी प्राथमिक शाळा व

Dr. Seema A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SHIS)
College of Physiotherapy, Pune-21

अध्यक्ष सचिव खजिनदार

संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांना तसेच माजी विद्यार्थ्यांना नविन नविन, कमी कालावधीचे, मुल्यवर्धित करणारे विविध कोर्सेस उपलब्ध करून देणे.

१७. दिव्यांग, मुकबधीर, अंध, मतिमंद व अनाथ यांच्यासाठी शैक्षणिक संस्था सुरू करणे, त्यांना व्यवसायाभिमुख शिक्षणाचे मार्गदर्शन करणे, शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे, त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोई पुरविणे.

१८. समाजातील मुलांमध्ये व प्रौढांमध्ये शिक्षण, कला, छंद व संस्कृती निर्माण करणे.

१९. विश्व जैविक संक्रमणापासून पृथ्वी वाचविण्यासाठी प्रयत्न करणे व त्याचा बिघडलेल्या समतोलाविषयी माहिती घेवून तो राखण्याबाबत भारत व भारताबाहेरील वैज्ञानिकांना बोलावून त्यांचे विचार जनमानसात रूजविण्यासाठी प्रयत्न करणे. विविध सामाजिक जनजागृती उपक्रम चालविणे.

२०. समाजामध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी पर्यावरणामधील तज्ञ व्यक्तींची भाषणे, चर्चासत्रे, मासिके व अद्ययावत माहिती प्रसिध्द करणे व त्यांचा जनमानसात प्रसार करणे. पर्यावरण संवर्धन विषयक विविध उपक्रम, जनजागृती कार्यक्रम राबविणे.

२१. संस्थेच्या विविध शाखांमधील विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्याला / विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत परदेशात शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन करणे व संधी उपलब्ध करून देणे.

२२. विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचा आणि गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करून सुर्यदत्त राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करणे.

२३. विद्यार्थ्यांच्या हिताकरीता विविध कार्यशाळा आयोजित करणे व संस्थेच्या हिताकरीता विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

Asst. Charity Commissioner, Pune

SEF'S Suryadatta Institute of Health Science (SHIS) Pune - 21

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune 21

अध्यक्ष सचिव खजिनदार

२४. सर्व समाजातील विद्यार्थ्यांना पात्रतेनुसार प्रवेश देणे.

२५. विविध सामाजिक, सांस्कृतिक, किडा विषयक वैज्ञानिक, मुल्यवर्धित करणारे, कौशल्य प्रदान करणारे इत्यादी उपक्रम राबविणे.

२६. संस्थेअंतर्गत व संस्था बाहय विविध शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, किडाविषयक ऑफलाईन व ऑनलाईन छापिल व दृकश्राव्य वर्तमानपत्र, मासिक इ. साहित्य प्रसारित करणे व संबंधित उपक्रम राबविणे.

२७. अनाथाश्रम, वृध्दाश्रम, बालसंगोपन केंद्र, महिला, शेतकरी सबलीकरण केंद्र इ. सामाजिक दुर्बल घटकांचे सक्षमीकरणाचे विविध उपक्रम राबविणे.

२८. विद्यार्थ्यांना पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य यांचे वाटप करणे. स्टायपेंड देणे, बक्षिस / पुरस्कार वितरित करणे इ. प्रोत्साहनपर कार्यक्रम राबविणे.

२९. नैसर्गिक आपत्तीमध्ये समाजोपयोगी आवश्यक उपक्रम राबविणे.

ब) सदर संस्था ही जैन अल्पसंख्याक आहे व तद्नुसार समाजाच्या हिताचे संरक्षण करेल व त्याकरीता तीचे खालील उद्देश राहतील:

१. जैन अल्प संख्यांक संस्थेचा दर्जा मिळविणे व जैन समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी व सुविधा पुरविणे, जैन समाजातील गरजू व पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत मार्गदर्शन करणे अथवा आर्थिक मदत करणे व जैन समाजातील विद्यार्थ्यांना पात्रतेनुसार विद्यालय, महाविद्यालय, विद्यापीठ इ. ठिकाणी प्रवेश देणे.

२. जैन समाजाच्या उन्नतीकरीता विविध सामाजिक उपक्रम राबविणे.

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

सही शिक्क्याची खरी नक्कल
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

Dr. Seemi A. Retharekar (PT)
Principal Cum Professor
Suryadatta Education Foundation's
Suryadatta Institute of Health Science (SIHS)
College of Physiotherapy, Pune 21

अध्यक्ष | सचिव | खजिनदार